# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## विभाग : आस्थापना विभाग

Scanned with OKEN Scanner

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**
महात्मा गांधी रोड, नेहरू चौक, जळगांव – ४२५००१ दूरध्वनी : २२२२२६१,६२,६३,६४,६५
**Municipal Corporation of the City of Jalgaon**
Mahatma Gandhi Road, Neharu Chowk, Jalgaon ४२५००१, Phone २२२२२६१,६२,६३,६४,६५

जा.क्र./ज.श.म.न.पा./आस्था/आस्था/३०४/२०२५-२६ दिनांक : २८/०४/२०२६

प्रति,
म.अतिरिक्त आयुक्त,
जळगांव शहर महानगरपालिका,
जळगांव.

**विषय :- जळगांव महानगरपालिकेत प्रशासकीय राजवटीच्या कालावधीत घेण्यात आलेले निर्णय,मंजुर कामे, आर्थिक व्यवहार व प्रशासकीय कारभाराबाबत सविस्तर श्वेत पत्रिका (White Pepar)प्रसिध्द करण्याबाबत**

**संदर्भ :- १) सन्मा.नगरसेविका सौ.वैशाली अमित पाटील यांचा दिनांक २३/०३/२०२६ चा अर्ज**
**२) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्रं./जमपा/प्रमुखका./४२७०/दि.३०/०३/२०२६ चे कार्यालयीन आदेश**
**३) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्रं./जमपा/प्रमुखका./१८३/दि.२०/०४/२०२६ चे कार्यालयीन आदेश**

उपरोक्त विषय व संदर्भांकित कार्यालयीन आदेशानुसार, आस्थापना विभागाशी संबंधित माहिती खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

१) जळगांव महानगरपालिकेच्या विविध विभागांकडुन विविध पदांची आवश्यकता असल्याने मा.आयुक्तांकडे निहीत असलेल्या अधिकाराचे अनुषंगाने ६ महिन्याच्या हंगामी कालावधीसाठी (१७९ दिवसांकरीता) माहे नोहेबर २०२३ ते माहे मे २०२४ या कालावधीत एकुण ८६ , माहे ऑगष्ट २०२४ ते माहे जानेवारी २०२५ या कालावधीत एकुण ७३ व माहे मार्च २०२५ ते माहे ऑगष्ट २०२५ या कालावधीत एकुण ३३ याप्रमाणे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मानधनावर विविध पदासाठी कर्मचारी नियुक्त करण्यांत आले होते. नियुक्त्या या शासन नियमानुसार, दैनिक वर्तमान पत्रात तसेच जळगांव शहर महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहीरात देऊन व त्या अनुषंगाने प्राप्त उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी व पडताळणीने करण्यांत आलेल्या होत्या.

२) आस्थापना विभागाकडील निविदा क्रं. ०१/२०२५-२६ नुसार निविदा प्रसिध्द करण्यांत आली होती. आवश्यक कागदपत्रे व प्रतिसाद न मिळाल्याने निविदा क्रं.०२ /२०२५-२६ दि.२६/०७/२०२५ रोजी पुनश्च निविदा प्रसिध्द करण्यांत आली होती. प्रसिध्द करण्यांत आलेल्या निविदेनुसार प्राप्त निविदाकारापैकी योग्य निविदाकार रॅपिड सिक्युरीटी अँड लेबर सर्व्हीसेस जळगांव यांचे रु.०१/- प्रतिमाह प्रति कामगार सेवाशुल्क या दरास मा.प्रशासक ठराव क्रं.३२३ दिनांक १६/०९/२०२५ नुसार मान्यता देण्यात आली. सदरचे मान्यतेच्या अनुषंगाने जा.क्रं.२०१२ दिनांक ९/१०/२०२५ नुसार कार्यादेश देण्यात आलेला होता. निविदेतील करारनाम्यानुसार आवश्यक कागदपत्रांच्या पुर्तता करणेबाबत संबंधित निविदाकारास वेळोवेळी कळविण्यात आलेले होते. वेतनासाठी येणा-या काही अडचणीमुळे सदरचे काम दिनांक ३१/०३/२०२६ पासुन बंद करण्यात यावे असे निविदाकार रॅपिड सिक्युरीटी अँड लेबर सर्व्हीसेस जळगांव यांनी कळविले होते. परंतु महानगरपालिकेत उपलब्ध मनुष्यबळ अपुर्ण असल्याने व नव्याने निविदा प्रक्रिया राबविणेसाठी कालावधी लागणार असल्याने नविन निविदा प्रक्रिया पुर्ण होईपावेतो कुशल अर्धकुशल कर्मचारी पुरविणेचे काम सुरुच ठेवावे, त्यात खंड पडणार नाही याची दक्षता घेणेबाबत रॅपिड सिक्युरीटी अँड लेबर सप्लायर्स,जळगांव यांना जा.क्रं. ४२६५ दि २७/०३/२०२६ अन्वये महानगरपालिकेतर्फे कळविण्यांत आलेले आहे.

**( धनश्री शिंदे )**
**उपायुक्त (आस्थापना)**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

Scanned with OKEN Scanner